# प्रेसनोट

## खंडणी विरोधी पथकाकडून कसबापेठ परिसरात एका इसमांकडून एक पिस्टल व दोन जिवंत काडतुसे जप्त

मा. वरिष्ठांनी अग्निशस्त्र विक्री करणारे व बाळगणाऱ्या लोकांवर कारवाई करण्याच्या सुचना दिल्याने खंडणी विरोधी पथकाचे पोलीस अधिकारी व स्टाफ असे दि. ०६/१२/२०१७ रोजी फरासखाना पोलीस स्टेशनचे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना खंडणी विरोधी पथकातील पोलीस नाईक सचिन अहीवळे यांना एक इसम पिस्टल व काडतूस घेवुन पोवळे चौक, कसबापेठ, पुणे येथे आला असल्याची माहिती मिळाल्याने खंडणी विरोधी पथकाचे सहा. पोलीस निरीक्षक विठ्ठल शेलार तसेच खंडणी विरोधी पथकाचे स्टाफने सापळा रचुन इसम नामे प्रशांत विठ्ठल बनसोडे, वय २४ वर्षे रा. सुतारआळी, महालक्ष्मी मंदिरा शेजारी, देहुगांव, ता. मावळ, जि. पुणे याला पकडून त्याचेकडून एक लोखंडी पिस्टल व दोन जिवंत काडतूसे अशी किं.रुपये २०,२००/- चे अग्निशस्त्र जप्त करण्यात आले असून सदरबाबत फरासखाना पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**सदरची कारवाई ही मा. प्रदिप देशपांडे साो, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, पुणे. मा. पंकज डहाणे साो, पोलीस उप आयुक्त गुन्हे पुणे व मा. समिर शेख साो, सहा. पोलीस आयुक्त गुन्हे-१ पुणे यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रघुनाथ जाधव, स.पो.नि. विठ्ठल शेलार व पोलीस स्टाफ सचिन अहीवळे, अविनाश मराठे, संतोष मते, रमेश गरुड, प्रमोद मगर, हणुमंत गायकवाड, भाऊसाहेब कोंढरे, फिरोज बागवान, सुधीर इंगळे, शिवानंद बोले, मंगेश पवार यांनी केली आहे.**